भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑

SAONER
SUB TREASURY
DS 108933
6 MAY 2026
Sub Treasury Officer Saoner

- किरायापत्र -

-*******-

लिहून घेणार :- श्री. शिशुपाल वामनराव रामटेके
वय: ५८ वर्षे, धंदा:शेती
ह.मु.पो.वा.नं.०३,तह.सावनेर,जि.नागपूर.
[ मु.पो.त.जि.प्लॉट क्रं.०४,सस नं.१७८ ]प्लॉट हं नं.१८६ च्या शेजारी

यांना,- भोसले व्हिलेज,फुरसुंगी-हडपसर,पूणे [४१२३०८]

लिहून देणार :- श्री.अशोक नारायण अनपट
वय: ५८ वर्षे, धंदा:नौकरी
मु.पो.त.रायल विला,प्लॉट नं.५०२, भोसले विलेज,पूणे सासवड
रस्ता,फुरसुंगी,पूणे
ह.मु.के/आफ श्री.शिशुपाल वामनराव रामटेके

ईसवी सन २०२६ सालकारणे किरायापत्र लिहून देतो ऐसाजे की, मी मौजा-
प्लॉट नं.४,एस नं.१७८,प्लॉ नं.१८६,च्या शेजारी भोसले व्हिलेज,फुरसुंगी-हडपसर-पु
येथील घर नं. प्लॉट न.०४, तुमचे मालकीचे घर ज्याची चतु:सिमा पुढीलप्रमाणे-

पुर्वेस :-

पश्चिमेस:-

उत्तरेस:-

दक्षिणेस:-

अशी आहे. मी तुम्हापासून किरायाने दरमहा रूपये१०,०००/-[दहा हजार

..

ANNEXURE - II



कबुल करुन ता. २०/०३/२०२६ पासुन ता. २०/०२/२०२७ तारखेपर्यंत खालिल नमुद केलेल्या अटींवर किरायाने घेतलेले आहे. ॲडव्हान्स म्हणून मी रु. २०,०००/-[विस हजार रु.] दिलेले[ लिहून घेणार यांना] आहे.

१] मी किराया दर महिन्याचे २० तारखेस अगाऊ देत जाईल. जर दिलेल्या तारखेस न दिल्यास मी ...... दर शेकडा प्रमाणे दरमहा व्याज देईल.

२] सदरहु घर/कमरा मला दुसऱ्याला किरायाने देण्याचा अधिकार राहणार नाही.

३] सदरहु कमरा मी राहण्याकरिता किरायाने घेतलेला आहे. तो मी अन्य दुसऱ्या कामास उपयोगात आणणार नाही.

४] तुम्हास ज्या वेळी कमरा खाली करुन घेण्याची आवश्यकता असेल त्याच्या १ [एक] महिना पुर्वी इतल्ला दयावा. म्हणजे मी कोणताच सबब न सांगता खाली करुन देईल. जर न दिल्यास या लेखावरुन तुम्हास खाली करुन घेण्याचा पूर्ण अधिकार आहे.

५] मी तुमचा कमरा सोडून जाईल त्याचे १[एक] महिन्याचे अगोदर तुम्हास तोंडी सुचना देईल. जर मी मध्यंतरी सोडुन गेल्यास पूर्ण १ [एक] महिन्याचा किराया देण्यास मी देणदार राहील.

६] मी कुलूप लावून बाहेरगावी गेल्यास व नियमाप्रमाणे ३ [ तिन] महिण्याचे भाडे न दिल्यास सदरहु कमरेचे कुलूप पंचासमोर तोडून आतील मालाचा व घर कमरेचा कब्जा घेण्यास तुम्हास पूर्ण अधिकार राहील.

७] आपला कमरा मी किरायाने घेताना ज्या हालतीत आहे. त्या हालतीत व्यवस्थेशीर पणे परत करेल. त्याप्रमाणे न केल्यास कमरेची नीटनेटकेपणा, सफाई व दुरुस्ती करण्यास जो खर्च तुम्हास लागेल तो विना उजर भरुन देईल व तुम्हास

..३

तो माझे कडुन वसुल करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

८] तुमचा कमरेची रिपेरींग तुमचे लेखी मंजूरी शिवाय मी करणार नाही. तसच किरायाची मुदत संपल्यानंतर पुढील ११ [ अकरा ] महिण्याकरीता मला तुमचा कमरा परत किरायाने घ्यावयाचा असल्यास किराया दरात योग्य ती वाढ करुन नवीन किरायापत्र लिहून देईल.

९] वरील शर्ती भंग केल्यास किराया बाबत अस्तित्वात असलेला कायद्यानुसार तुम्हास माझे पासुन कमरा खाली करुन घेण्याचा एकदम पूर्ण हक्क प्राप्त होईल.

१०] तुमचे कमरेमध्ये असलेले फर्निचर [तुमच्या मालकीचे] मी वापरील.

करिता वरील प्रमाणे किरायापत्र मी राजीखुशीने सावनेर मुक्कामी लिहून दिले ते मला व माझे वारसास लागून असे.

सावनेर

दि. ११/०५/२०२६

लिहून घेणार :- ----------------------------

[श्री. शिशुपाल वामनराव रामटेके]



लिहून देणार :- ----------------------------

[ श्री. अशोक नारायण अनपट]

